# स्वतंत्रतेच्या वातावरणातच मुले चांगली वाढतात

लहान मुलाच्या नैसर्गिक वाढीच्या दृष्टीने, त्याच्या किंवा तिच्या शिकण्याच्या दृष्टीने, मुक्ततेचे वातावरण अनुभवायला मिळणे; ही एक अनिवार्य अशी गरज असते. मुले स्वातंत्र्याच्या वातावरणातच फुलतात आणि विकास पावतात. किंबहुना असे म्हणता येईल की, जन्मल्यापासून प्रौढतेकडे जाण्याच्या प्रवासात वेगवेगळया टप्प्यांना प्रत्येकालाच, स्वातंत्र्य हे इंधनासारखे उपयुक्त ठरते. लोकशाहीचे मूल्य मानणाऱ्या आपल्या देशात, 'व्यक्तिस्वातंत्र्य' हा मूलभूत हक्क मानलेला आहे. आपण लक्षात घेण्याची गोष्ट अशी की, हे व्यक्तिस्वातंत्र्य लहान मुलांनाही, त्यांच्या विकासाची नैसर्गिक गरज म्हणून भोगता आले पाहिजे. कारण, बालकाच्या व्यक्तिगत तसेच सामाजिक विकासासाठी स्वातंत्र्य हे पायाभूत तत्त्व आहे.

मुले घरी असोत वा शाळेत असोत अथवा अन्य कोठेही असोत, त्याच्याकडे 'एक स्वातंत्र्य व्यक्ती' म्हणून प्रौढांनी पहिले पाहिजे. प्रत्येकजणच जन्माला येताना एक स्वतंत्र व्यक्ती म्हणूनच येत असतो. प्रत्येकाला निसर्गतःच स्वतःचे खास असे वेगळेपणही असते; त्यामुळे लहानपणापासूनच प्रत्येकाला स्वतंत्र व्यक्तित्व आणि स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असते. ते टिकविण्याचा, जोपासण्याचा हक्क प्रत्येकालाच असावा लागतो.

लहान मुलांच्या बाबतीत त्यांचा होणारा मेंदूचा विकास आणि त्याकरवी होणारा शारीरिक, बौद्धिक, भावनिक व सामाजिक हा सर्वस्वी मुलांना असणाऱ्या विविध प्रकारच्या 'स्वातंत्र्यांशी' सबंधित आहे. ही गोष्ट फारच थोड्या पालकांना माहीत आहे. कोणती आहेत ही स्वातंत्र्ये ?

**हालचालीचे स्वातंत्र्य :**

हे स्वातंत्र्य सर्वात महत्त्वाचे. वय जितके लहान तेवढे ते अधिक महत्त्वाचे. वयाच्या थेट चौदा-पंधराव्या वयापर्यंत मुलांनी खूप खेळले पाहिजे, हुंदडले पाहिजे, मुलांचा तथाकथित 'अभ्यास' मुलांच्या खेळांच्या आड येता कामा नये. शारीरिक हालचालींचे मोठे कार्य म्हणजे त्याने मेंदूमधील पेशींची परस्पर जुळणी नीटपणे होत राहते आणि या जुळणीवर तर आपला सारा विकास, सारी कार्ये अवलंबून असतात.

**बोलण्याचे स्वातंत्र्य :**

जन्मापासून बालकांची वाटचाल 'बोलण्या'च्या दिशेने चालू होते; कारण बालकांना आपल्या घरातील भाषा आत्मसात करायची असते. ती भाषा इतरांकडून ऐकून आणि स्वतः बोलण्याचा प्रयत्न करूनच आत्मसात होत असते. या प्रयत्नांसाठी मुलांना मुक्तता हवी असते, बंधने नको असतात.

बडबडणे, सतत बडबडणे हे मेंदूमधील भाषिक केंद्रे तयार होण्यासाठी एकमेव साधन असते. त्याचा वापर करण्याचे स्वातंत्र्य हे खास मुलांचे असते. आपण त्यांना सारखे गप्प बसायला सांगून हे स्वातंत्र्य हिरावून घ्यायचे नसते.

**अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य :**

बोलण्याच्या, बडबडण्याच्या पुढची पायरी असते ती, आपल्याला काय म्हणायचे आहे, ते म्हणायची, आपल्याला जे दुसऱ्याला सांगावेसे वाटते ते सांगायची, आपल्याला सुचणाऱ्या कल्पना, आपले विचार, आपल्या गरजा मांडण्याची मुभा मुलांना असावी लागते. याला 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य' असे म्हणता येईल. वास्तविक संवाद, विचार, भावना, कल्पना या सर्व मुलांच्या अंतर्गत ऊर्मी असतात. या आपणहून बाहेर पडू इच्छितात. याकरिता मुलांना 'अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य' असावे लागते. या अभिव्यक्तीद्वारे माणूस दुसऱ्याशी संपर्क साधत असतो. त्यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे जसे व्यक्तिगत विकासाचे साधन असते. तसेच ते व्यक्तीच्या सामाजिकतेच्या विकासाचेही साधन असते.

**विचार व कल्पनांचे स्वातंत्र्य :**

मुलांचे स्वतःचे खास असे एक कल्पनाविश्व असते. मुले त्यात रमतात. एवढेच नव्हे तर त्यातून त्यांची बुद्धीच विकसित होत असते. विचारांचेही असेच असते. विचारशक्ती जेवढी प्रबल तेवढे त्यांचे भावी आयुष्य संपन्न. त्यामुळे मुलांसमोर असलेल्या प्रश्नांमध्ये मुलांनी स्वतःच विचार करून त्यांच्या सोडवणुकीचा शोध घ्यायचा असतो. यातूनच विचारक्षमता घडत जाते. अर्थात याचा पाया बालकाला मुक्त विचारासाठी लागणारा वेळ व वातावरण उपलब्ध होण्यात असतो. लहानपणापासूनच मुलांचे विचारस्वातंत्र्य जोपासले जायला हवे.

**अनुभवाचे स्वातंत्र्य :**

मोठ्या माणसाचे काय किंवा लहान मुलांचे काय, त्यांचे सारे शिक्षण अनुभवांतूनच होत असते; अशावेळी विकासयोग्य असे अनुभव मुलांना कसे मिळतील याची व्यवस्था प्रौढांनी करायची असते. मात्र, त्याचबरोबर हे अनुभव आपल्या कलाने, आपल्या सोयीनुसार, वेळेनुसार घेण्याचे स्वातंत्र्य मुलांना असावे लागते. मुलांभोवती, पालकांनी वा शिक्षकांनी अनुभवांची कितीही रेलचेल केली असली तरी त्यातून आपल्या गरजेनुसार व आवडीनुसार या अनुभवांतून निवड करण्याचे स्वातंत्र्य मुलांना हवे असते ते तसे मिळणे हा त्यांचा हक्क असतो.

**विश्रांतीचे स्वातंत्र्य :**

लहान मुलांच्या बाबतीत एक फार मोठी गोष्ट आपणा सर्वांनी लक्षात घ्यायला हवी. लहान मुलांचे जन्मल्यापासून अखंडपणे शिकण्यासाठी धडपडणे चालू असते. त्यांच्या जीवाला मुळीच

स्वस्थता नसते की त्यांना काडीचीही उसंत नसते. मुले आपल्या प्रेरणेने सारखी काही न काही कृतीत मग्न असतात. अशावेळी प्रामुख्याने झोप हीच त्यांची हक्काची विश्रांती असते. ती त्यांना हवी तेव्हा आणि भरपूर मिळायला हवी. झोपेचे स्वातंत्र्य हे केवळ विश्रांतीसाठीच नव्हे तर मुलांच्या बौद्धिक विकासासाठीही आवश्यक असते. कारण शिकलेले सारे स्मृतीत ठेवण्याचे काम झोप करत असते. लक्षात ठेवा, लहानपणी छान झोपणारी मुले पुढे आयुष्यभर ‘जागरूक’ असतात !

❖